# अक्षरांचा मळा




वसंत जोशी

# अक्षरांचा मळा

वसंत जोशी

प्रकाशन विभाग
माहिती आणि प्रसारण मंत्रालय
भारत सरकार

March 1992 Phalgun 1913

© प्रकाशन विभाग

मूल्य : रु. १८.००

प्रकाशक, प्रकाशन विभाग, माहिती आणि नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार,
पटियाला हाऊस, नवी दिल्ली-१
मुखपृष्ठ - रेखाटने - हर्षा शाह, स्वाती जोशी.

प्रकाशन विभाग ● विक्री केन्द्र

- सुपर बझार, कॅनॉट सर्कस, नवी दिल्ली-११० ००१.
- कॉमर्स हाऊस, करीमभॉय रोड, बेलार्ड पिअर, मुंबई-४०० ०३८.
- ८, एस्प्लनेड ईस्ट, कलकत्ता-७०० ००१.
- एल. एल. ए. ऑडिटोरियम, ७३६, अण्णामलाई, मद्रास-६०० ००२.
- बिहार स्टेट को ऑपरेटिव्ह बँक बिल्डिंग, अलोक राजपथ, पटणा-८०० ००४.
- प्रेस रोड, त्रिवेंद्रम-६९५ ००१.
- १०-बी, स्टेशन रोड, लखनौ-२२६ ००४.
- स्टेट अर्चालॉजिकल म्युझिअम बिल्डिंग, पब्लिक गार्डन, हैदराबाद-५०० ००४.

मुद्रक : मॉडर्न आर्टस अँड इंडस्ट्रिज, १५१ ए टू झेड इंडस्ट्रियल इस्टेट, मुंबई-४०० ०१३.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| अक्षरांचा मळा | १ |
| बुवा का पळाले ? | ९ |
| गोष्ट राजा चक्रमसिंगाची | १७ |
| रावणाचा पराभव का झाला ? | २३ |
| रामा शिवा गोविंदा ? | २५ |

# प्रकाशकीय

बालकुमारांच्या हाती ख्यातनाम लेखक श्री वसंत जोशी यांच्या कथांचा खजिना देताना आम्हाला आनंद होत आहे. श्री जोशी यांची तुमच्याशी मासिकांतून केव्हाच गट्टी जमली आहे. त्यांचा मी अधिक परिचय तो काय देणार.

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण खात्याच्या प्रकाशन विभागातर्फे मुलांसाठी विविध भाषांमधे काही पुस्तकं प्रसिद्ध करण्याचं ठरविण्यात आलं. फारच कमी दिवसांत हे काम पूर्ण करायचं होतं. मराठी पुस्तकांच्या संपादनाची जबाबदारी आमच्या योजनेचे संपादक श्री नीतीन केळकर यांच्यावर सोपवली होती. त्यांच्या प्रयत्नांमुळेच हे पुस्तक आपल्यापर्यंत पोहोचवणं शक्य झालं. त्यांचेही आभार.

*डॉ. श्यामसिंह शशि*
संचालक

# अक्षरांचा मळा

त्या गावाचं नाव होतं अंगठापूर. नाव जरा विचित्र वाटत नाही? पण काय करणार? त्या गावच्या पाटलानंच फर्मान काढून त्या गावाचं नाव एके दिवशी बदललं. पूर्वी त्या गावाचं नाव होतं सरस्वतीपूर!


गावच्या पाटलाचं नाव होतं भीषणराव! भीषणराव बलदंड होते. तसे दयाळू होते. गोरगरिबांना ते मदतही करीत. पण त्यांचा राग फार वाईट. एकदा जर का चिडले की मग त्यांना कुणाची पर्वा वाटत नसे. भीषणरावचे वडील गंभीरराव यांनी भीषणराव सहा वर्षाचे असताना त्यांना शाळेत घातलं.पण भीषणरावांना शाळा आवडत नसे म्हणून ते रोज शाळेतून पळून घरी येत. एकदा दोनदा तीनदा पाहून मग त्यांच्या मास्तरांनी त्यांना कडक शिक्षा केली. शंभर छड्या मारल्या. बस्स. एवढचं घडलं. आणि मग भीषणराव शाळेत गेलेच नाहीत. शाळा, शिक्षण, लिहिणं, वाचणं या सर्वच गोष्टींचा त्यांना राग येऊ लागला.

एक दोन वर्ष गेली. भीषणराव गंभीररावांबरोबर शेतावर काम करू लागले. शेतीची चांगली माहिती भीषणरावांना झाली. पण अचानक गंभीरराव साप चावून वारले. मग पाटीलकी भीषणरावांकडं आली.

भीषणरावांना शाळेचा तिटकाराच होता म्हणून त्यांनी गावातली शाळा बंद करून टाकली. मग गावातली मुलं गुरं राखू लागली. शेतावर जाऊ लागली. थोड्याच दिवसात गाव निरक्षर बनलं. गावात दुकानं होती. पण दुकानावर पाट्या नव्हत्या. कारण त्या पाट्या वाचणार कोण? अक्षर ओळखच कुणाला नव्हती. हळूहळू गावातलं पोस्ट ऑफिस बंद झालं. कारण कार्ड, पाकिटं घेणार कोण? लिहिता कुणाला येत होतं? गावातली बँकही बंद झाली. पैसे बँकेत ठेवणार कसे? काढणार कसे?

गावात नाटक, सर्कस कंपनी यायची. गावात तमाशा व्हायचा. तेवढीच गावकऱ्यांची करमणूक. या गावात कुणी पाहुणा येत नसे. कुणी जात नसे. गावाजवळून गाढवी नदी वाहात होती. पूर्वी या नदीचं नाव होतं जान्हवी. पण गावातली सगळी माणसं अक्षरशत्रू बनल्यानंतर जान्हवी नदीला सर्व जण गाढवी नदी म्हणू लागले. याच नदीच्या काठी ईश्वराचं एक मंदिर होतं. शंकराची मोठी पिंडी फार सुरेख होती. भीषणरावांना ती पिंडी, पिंडी वाटत नसे. त्यांना वाटायचं हा ईश्वराचा अंगठा आहे. त्यामुळं त्या ईश्वराचं नाव भीषणरावांनी अंगठेश्वर ठेवलं. सारा गावच अंगठेबहाद्दर झाल्यानंतर मग त्यांचा ईश्वर हा अंगठेश्वरच होणार! त्यापेक्षा दुसरं काय घडणं शक्य होतं?

या अंगठापूर गावात शेजारच्या गावात राहणाऱ्या किरण नावाच्या मुलाची म्हातारी मावशी राहात



होती. किरण नुकताच पदवीधर झाला होता. तो आपल्या आईला म्हणाला, "आई, मी अंगठापूरला जाऊन नंदा मावशीला पेढे देऊन येऊ? मी पदवीधर झालो याचा तिलाही आनंद वाटेल. अभिमान वाटेल!"

"अवश्य जा. पण एक लक्षात ठेव. त्या गावा जवळून वाहणाऱ्या गाढवी नदीत आंघोळ करू नकोस!"

"पण का?"

"लोक म्हणतात त्या गाढवी नदीत आंघोळ करणाऱ्या माणसाची बुद्धी नष्ट होते आणि तो गाढवासारखा ओरडू लागतो!"

अस्सं? आणखी काही सूचना?"

"आणखी एक सूचना. अंगठेश्वराचं दर्शन घेऊ नकोस!"

"का बरं?"

"अंगठेश्वराचं दर्शन घेतलं की डोकं एकदम लिंबा एवढं लहान होतं आणि दोन्ही हातांचे अंगठे मात्र नारळा एवढे मोठे होतात."

"ठिक आहे आई. तुझ्या सांगण्याप्रमाणं वागतो. मग तर झालं ना? मग तर मला मावशीच्या गावी जायला हरकत नाही ना?"

"जा, पण संध्याकाळी लगेच परत ये!"

किरणनं आईचा निरोप घेतला. बरोबर पेढ्यांनी भरलेली मोठी पिशवी घेतली. अंगठापूरला एस्.टी. बस जात नव्हती म्हणून तो भल्या पहाटे पायीच निघाला. दहा मैल अंतर काढून तो सकाळी नऊ वाजता अंगठापूरला पोहचला.

गावात गेल्या गेल्या त्यानं पाटलांची चौकशी केली.

"भीषणराव चावडीत असतील काय?"

"इथं चावडी नाही!"

"मग पाटील कुठं बसतात?"

"वडाच्या पारावर!"

"त्यांची कचेरी- दप्तर?"

"कचेरी? दप्तर? शाळा? असे शब्दही उच्चारायला या गावात बंदी आहे!"

"गावात कुणी शिकलेला माणूस?"

"अजिबात नाही... शिकलेला सोडा. अक्षरं ओळखणारा देखील माणूस या गावात नाही!"

"बाप रे... मग या गावचे सर्व व्यवहार कसे होतात?"

"तोंडी!"

"मग फसवा-फसवी होत असणार?"

"आम्ही नाही याबद्दल बोलणार! तुम्ही आपले पाटलाना भेटा!"

किरण पारावरच्या पाटलाना भेटायला भेला.

"रामराम पाटील!"

"कोण गाव पाहुणं?"

"शेजारच्या गावचा."

"कुणाकडे आलात?"

"माझी मावशी इथे राहते?"

"इथे म्हणजे कुठे?"

"समोरच्या गल्लीतलं पाचवं घर?"

"पाचवं म्हणजे?"

"एक, दोन, तीन, चार, पाच... आकडे माहीत नाहीत?"

"नाही..."

"मग तुम्हाला मावशीचं घर मी कसं सांगणार?"

"तुम्ही शाळा शिकलेली माणसं असाच गोंधळ घालता... मी विचारतो त्याचं उत्तर द्या... ते काळं कुत्रं समोरच्या गल्लीत ज्या घरासमोर उभं आहे ते घर का?"

"होय, पाटील... तुम्ही कसं ओळखलंत?"

"अहो मी या गावचा पाटील आहे... तुम्ही मला काय समजता?"

"पाटील ते खरं आहे... पण आता पहा ते काळं कुत्रं मघा उभं होतं ते त्या जागी आता नाही. ते त्यापुढच्या चौथ्या घरासमोर उभं आहे. तुम्ही आता माझ्या मावशीचं घर कुठं आहे हे कसं सांगणार?"

"अरेच्या मारी... खरंच की! पण तरी काही बिघडलं नाही. ते कुत्रं मागं पुन्हा येईल तेव्हा तुमच्या मावशीच्या घरासमोर आलं की मी ओरडेन.... 'ते पहा तुमच्या मावशीचं घर ... !"

"पण ते कुत्रं मागं न येता पुढंच गेलं तर?"

"तर? आम्ही स्वत: तुमच्याबरोबर चालत येऊन ते घर दाखवू!"

"एवढे श्रम करण्यापेक्षा सरळ घराचा क्रमांक का सांगत नाही? शाळा शिकला नाहीत?"

"शाळा शिकणं आम्हाला पसंत नाही!"

"मग तुम्हाला काय पसंत आहे?"

"माणसानं उद्योग करावा!"

"तुम्ही काय करता? तुमची मुलं काय करतात?"

''आम्ही शेती करतो!''

''किती एकर शेती आहे?''

''आमची भरपूर शेती आहे!''

''पण मी विचारतो किती एकर शेती आहे?''

''असेल किती तरी . . .!''

''कोण कोणती पिकं घेता?''

''ज्वारी, मका, डाळी, आणि . . .''

एकूण किती पिकं घेता?''

''उगाच जास्त प्रश्न विचारू नका आम्हाला लागणारी सर्व पिकं आम्ही घेतो . . .''

''रागवू नका पाटील . . . तुमच्या थोरल्या मुलाचं नाव काय?''

''एकनाथ!''

''तुम्ही उपवास केव्हा करता?''

''एकादशीला!''

''उपवास केव्हा सोडता?''

''द्वादशीला!''

''तुम्हाला जर कुणी वेडं वाकडं बोललं तर तुम्ही काय कराल?''

''त्यांच्या दोन तोंडात लगावीन!''

''कुणी कुस्ती खेळण्यासाठी पैलवान तुमच्या गावी आला तर तुमचा मुलगा एकनाथ, पैलवान आहे. तर तो त्याच्याशी कुस्ती खेळेल?''

''खेळेल म्हणून काय विचारता? त्याला तो चारी मुंड्या चीत करील . . .''

''पाटील बाबा आता तुम्ही माझ्या प्रश्नांना जी उत्तरं दिलीत त्यावरून तर तुम्ही शाळेत गेला नव्हता हे खरं वाटत नाही!''

''आम्ही खरंच् शाळेत गेलो नाही!''

''मग 'एक'नाथ, म्हणता म्हणजे 'एक' तुम्हाला माहीत आहे. 'एकादशी' म्हणता त्यावरून तुम्हाला 'अकरा', 'द्वादशींवरून 'बारा', 'दोन' तोंडात लगावीन या तुमच्या तयारीवरून तुम्हाला 'दोन' आणि 'चारी' मुंड्या चीत करून 'चार' हे आकडे तुम्हाला माहीत आहेत हे स्पष्ट होतं की!''

पाहुण्या पोराच्या बोलण्यानं पाटील चमकले, आणि म्हणाले, ''पोरा, तू खूप शाहणा दिसतोस! या म्हाताऱ्याला जरा पाणी पाज. समोर माझा वाडा आहे. बाहेरच्या खोलीत 'चौ'पाई जवळ 'ति'वई वरच्या माठातलं पेलाभर पाणी आणशील?''

''पाटील बाबा ''चौ''पाईतला 'चौ' म्हणजे चार. चार पायाची ती 'चौ'पाई. आणि 'ति'वई


अंगठापूर
शिक्षण बंद
लिहिणे वाचणे नको
शाळा कशाला?

म्हणजे 'तीन' पायाची. यावरून तुम्हाला तीन आणि चार हे आकडे माहीत आहेत. फक्त आकडयांचे आकार म्हणजे आकृती माहीत नाहीत. आजोबांची म्हणजे तुमची काठी 'एका' सारखी दिसते, दोन उलट्या चमचा सारखा, तीन मारुतीच्या जबड्यात लपला आहे. चार म्हणजे उडता पक्षी. पाच म्हणजे शिंगवाला ... अशी आकड्यांची ओळख तुम्हाला करून दिली तर तुम्हाला आकडे ओळखता येणार नाहीत ?''

''पण आम्हाला त्याची गरज काय ? अक्षरं शिकलो नाही आकडे शिकलो नाही म्हणून आजपर्यंत आमचं काही अडलं नाही ... कुठलंही सरकार-दरबारचं काम असलं तरी आमचा हा अंगठा सगळीकडं चालतो !''

''अंगठ्याचा असा उपयोग करावा माणसानं ?''

''देवानं दिलेल्या प्रत्येक अवयवाचा उपयोग माणसानं करायलाच हवा !''

''पण अंगठ्याचा उपयोग तो शाईत बुडवून त्याचा छाप उठवण्यासाठी ?''

''त्यात काय बिघडलं ? कोणत्याही कागदावर अंगठा उठवला की तो कागद पक्का कायदेशीर होतो. देवानं अंगठा दिला कशाला ?''

''पाटील तुम्ही म्हणता ते मला मान्य आहे. पण जर देवानं अंगठा छाप उठवण्यासाठी दिला असेल तर मग अंगठ्याचा उपयोग तुम्ही नांगरणी, पेरणी करताना अजिबात करता कामा नये ...''

''अंगठ्याचा उपयोग जड काम करताना करावाच लागणार !''

''ठीक आहे जड कामासाठी अंगठ्याचा उपयोग करा. पण पाण्याचा हा पेला तर छोटा हलका आहे ... तो उचलताना तरी अंगठ्याचा उपयोग करू नका !''

''ठीक आहे ... अहो पण नुसत्या चार बोटांनी पेला कसा उचलणार ?''

''ठीक आहे. अंगठ्याचा वापर पेला उचलण्यासाठी अवश्य करा ... पण निदान पानातला अगदी छोटा घास उचलून तोंडात टाकताना तरी अंगठ्याचा वापर करू नका ...''

''नाही. पाहुणे पानातला घास अंगठा वगळून उचलणार कसा ? तोंडात घास टाकणार तरी कसा ?''

''ठीक आहे. जमीनीवर पाच पैसे पडले आहेत ते तरी अंगठ्याची मदत न घेता उचलून दाखवा ...''

''नाही जमणार पाहुणे !''

''मग अंगठ्याला शाई लावून त्याचा छाप उठवण्यासाठी देवानं माणसाला आंगठा दिला असं कसं म्हणता ?''

''पाहुणे, तुम्ही फार वाद घालता !''

''मी वाद घालीत नाही. मी बोलतो ते चुकीचं का एवढं सांगा ?''

''नाही ... !''

''शाईनं जांभळा झालेला अंगठा तुमच्या पानातल्या अन्नाला लागला तर चालेल ?''

"नाही!"

"देवळातल्या ईश्वराच्या पिंडीला तुम्ही रोज सकाळी स्नान घालता. अगदी घासून पुसून कधी दुधाची पण आंघोळ देवाला घालता. तुमच्या अंगठ्याला लागलेल्या शाईनं तुमचा देव, निळा, जांभळा होऊ दे?"

"शाईनं भरलेला अंगठा घासून पुसून स्वच्छ करून मगच देवाला स्पर्श करू!"

"आधी आंगठा घाण करा. मग तो स्वच्छ करा. हा धंदा हवाच कशाला?"

"मग काय करावं आम्ही?"

"हाताच्या अंगठ्या जवळच्या अंगठ्याचा वापर करावा!"

"पण देवानं तर एका हाताला एकच अंगठा दिलाय...!"

"देवानं दुसरा पण अंगठा दिलाय. त्या अंगठ्याला हवी तसली शाई लागू दे. चिंता नाही!"

"पण दुसरा अंगठा कुठाय?"

किरणनं खिशातलं बॉल पेन पाटलांच्या हाती देत म्हटलं—देवानं सर्वांसाठी हा जो अंगठा दिलाय त्याचा वापर करायला तुम्ही शिकायला हवं!"

"म्हणजे पुन्हा शाळा आलीच की!"

"पाटील शाळेला नावं का ठेवता? शाळा का वाईट असते?"

"शाळा वाईटच. तिथं काय पिकतं? त्यापेक्षा आमचा मळा बघा... पावसापूर्वी जमीन नांगरल्या नंतर कशा छान सरळ काळ्या काळ्या लांब रेषा दिसतात. पेरणी केली आणि पाऊस झाला की हिरव्या पोपटी छोट्या पोपटांच्या रांगा जमिनीतून बाहेर येतात..."

"या बॉल पेनमध्ये देखील लाल, निळी, काळी, जांभळी, हिरवी अशा रंगाची रिफील घालता येते. जमिनीवरच्या हिरव्या ओळींनी तुम्ही सुखावता ते ठीकच आहे. पण कागदावरच्या अनेक रंगांचं इंद्रधनुष्य या पेन मधून प्रकटतं ते का पाहात नाही? चार अक्षरं शिकलात की तुम्ही पांढऱ्या स्वच्छ कागदावर समृद्ध अक्षरांचा मळा फुलवू शकता. जगातलं सारं शहाणपण अक्षरात साठवता येतं! महाभारत, रामायण ऐकण्यासाठी, कुणा कीर्तनकार बुवाची, तो कधी येईल, म्हणून वाट पाहण्याची गरज नाही. अक्षरांच्या ओळखीमुळं तुमच्याशी व्यास, वाल्मिकी, त्यांच्या ग्रंथांतून बोलायला लागतील. पाटील, तुम्ही मर्द मराठे... तुमचे पूर्वज लढता लढता रणांगणावर पडले त्यांचा इतिहास तुमच्याशी बोलू लागेल!"

"बस्स...बस्स...पाहुणे आता काही सांगू नका. आतापर्यंत आम्ही फळांसाठी, फुलांसाठी, धान्यासाठी मळा फुलवला. सर्व जगाचं ज्ञान देणाऱ्या कल्पवृक्षांचा-अक्षरांचा मळा फुलवण्यासाठी आम्ही आमचं उरलेलं आयुष्य वेचू... पण त्यासाठी तुम्ही आमच्या या गावात शाळा सुरू करायला हवी..."

"मी तर तेवढ्यासाठी या गावात आलोय" किरण हसत म्हणाला.

● ● ●

# बुवा का पळाले ?

उद्यमपूर एक लहान गाव. वस्ती जेम तेम पाच हजार. त्या गावाजवळून एक नदी वाहात होती. नदीचं नाव प्रतिभा. गावातली माणसं गरीब होती पण खाऊन-पिऊन सुखी होती.

नदी जवळच एक मोठं महादेवाचं मंदिर होतं. देव दर्शनासाठी, कथाकीर्तन ऐकण्यासाठी, लोक त्या मंदिरात जात. गावचे पाटील मल्हारबाबा होते. ते रोज सकाळ संध्याकाळ या महादेवाच्या दर्शनाला जात.

कधी कुणी कथेकरी बुवा गावात आला तर त्याची राहण्या उतरण्याची सोय याच मंदिरात मल्हारबाबा करीत. त्याला डाळ, तांदूळ, कणीक, गूळ, तूप असा शिधाही देत. कथेकरी बुवा मग रामायण-महाभारताच्या कथा सांगून लोकांना उपदेश करीत. अशी ही परंपरा गेली कित्येक वर्षं चालू होती.

एके दिवशी मात्र नवल घडलं. एक दांडगेश्वर बुवा अगदी भल्या पहाटेच या मंदिराच्या पायरीवर येऊन बसले होते.

नित्याप्रमाणे मल्हारबाबा देव दर्शनाला गेले. त्यांनी या बुवांना पाहिलं. नमस्कार केला. त्यांची चौकशी केली,

"महाराज, आपण केव्हा आलात ?"

"आम्हाला येऊन पन्नास वर्षं झाली!"

"आपलं वय नाही विचारलं महाराज मी. आपण आमच्या या गावात केव्हा आलात हे मी विचारलं!"

"पंच पंच उष: काली!"

"आम्हाला आनंद झाला महाराज! आम्ही आपली सगळी सोय करू!!"


"तुम्ही कोण ?"

"मी या गावचा पाटील. नाव मल्हारबाबा!"

"मी महादेवाचा परमभक्त. वाराणशीला गंगेच्याकाठी राहून दोन तपं तपश्चर्या केली!"

"फारच छान महाराज! तुमच्यासाठी दूध आणि फळं पाठवतो!"

"एक घागर भरून दूध पाठवा. दोन डझन केळी पाठवा. दुपारी मला आवडणारी पक्वान्नं म्हणजे शिरा-पुरी, लाडू, श्रीखंड, जिलेबी, पाठवा! परंतु संध्याकाळी मात्र फक्त एक घागर दूध आणि दोन



डझन सफरचंद पाठवा!''

मल्हारबाबांना बुवांचं बोलणं विचित्र वाटलं. तरी पण बुवांची सर्व सोय त्यांनी केली.

एके दिवशी मल्हारबाबांनी बुवांना विचारलं,

''महाराज, लोकांना रामायण-महाभारताच्या कथा सांगणार काय? तुमच्या अमृत-वाणीनं आमचे कान तृप्त व्हावेत अशी गावकऱ्यांची इच्छा आहे.''

''कथा-कीर्तनं करणारा मी बुवा नाही!''

'' अस्सं? मग तुम्ही काय करता?''

''आम्ही वाद घालतो!''

''वाद कशासाठी घालता? त्याचा तुम्हाला आणि लोकांना फायदा काय?''

''मल्हारबाबा, तुम्ही भलतेच अडाणी दिसता!''

''दिसतो नाही... मी अडाणीच आहे. पण तुम्ही वाद कशासाठी घालता ते सांगा ना?''

''अहो मी गेली बारा वर्षं वाद घालीत फिरतोय. प्रत्येक गावात जाऊन तिथल्या विद्वान पंडितांबरोबर वाद घालून, वादात त्यांचा पराभव करून त्यांच्याकडून अजिंक्यपत्र घेतो.''

''पण वाद कोणत्या विषयावर घालता?''

''कोणत्याही विषयावर. सर्व शास्त्रं, वेद, पुराणं, उपनिषदं माझी पाठ आहेत. तुमच्या या गावात वेदशास्त्राचा अभ्यास केलेला कुणी ज्ञानी माणूस आहे काय? तो माझ्याशी वाद घालू शकेल?''

''नाही महाराज! आमच्या गावात कुणालाही वाद घालायला वेळ नाही. जो तो आपल्या कामात व्यग्र असतो. शेतकरी शेतात काम करतो. मुलं शाळेत जातात...''

''बस्स्... बस्स्... बकवास बंद करा. तुमच्या गावात नुसती अडाणी माणसं राहतात असं सरळ का सांगत नाही?''


''महाराज, तुम्ही आमच्या गावकऱ्यांना अडाणी का म्हणता? आमच्या गावचा सुतार, सुतारी कामात दर्दी आहे. विणकर छान कापड विणतो. शेतकरी उत्तम पिकं घेतो...''

''पुन्हा सर्व अडाण्यांचीच नावं घेताय तुम्ही मल्हारबाबा!..''

''महाराज, अशीच माणसं आमच्या या गावात राहतात. फुकटचा वाद-विवाद करायला इथं कुणालाच वेळ नाही.''

''मल्हारबाबा वाद-विवाद करण्यासाठी माणसाला अक्कल लागते. तुम्ही पडलात अडाणी गोळे! तुम्हाला या बिषयात गती नाही. तेव्हा तुमच्याशी या बाबतीत बोलून फायदा काय? तुम्ही आता असं करा. एक हजार रुपये दंड म्हणून तुम्ही मला द्या. आणि एक अजिंक्यपत्र द्या. म्हणजे मी दुसऱ्या गावी जातो.''

''महाराज, तुम्ही जे पत्र म्हणता ते आमच्या शाळेतल्या गुरुजींकडून लिहून आणून देतो. पण



एक हजार रुपये दंड कुठून देऊ ?''

''मग असं करा पाटीलबाबा... तुमच्या या गावच्या लोकांची या देवळात सभा बोलवा. त्या सभेत मला तुम्ही गावातर्फे अजिंक्यपत्र द्या. आणि माझ्यासमोर सर्व गावाच्या वतीनं एक हजार वेळा साष्टांग नमस्कार घालून जमिनीवर नाक घासा आणि म्हणा, ''या गावचे सर्व लोक अडाणी आणि गाढव आहेत!''

बुवांचं हे उद्धटपणाचं बोलणं ऐकूण मल्हारबाबा मुकाट्यानं उठले. आणि आपल्या वाड्यावर आले. चार मित्रांना बोलवून बुवा काय बोलले ते सांगितलं. आता पुढं काय करावं या बद्दलचा सल्ला देखील त्यांनी मागितला...!''

महादेवाच्या देवळात उतरलेल्या बुवांनी मल्हारबाबांचा व साऱ्या गावकऱ्यांचा अपमान केला ही बातमी आता गावभर झाली.

सायंकाळी मल्हारबाबा देवदर्शनाला निघाले होते. वाटेत रामजी शेतकऱ्याचा मुलगा, विजयेंद्र त्यांना भेटला आणि म्हणाला,

''मल्हारबाबा, मंदिरातल्या बुवांना सांगा की मी त्यांच्याशी वाद घालायला तयार आहे!''

''अरे, पण तू केवढा लहान... ते बुवा केवढे मोठे पंडित...!''

''असू देत... त्यांना सांगा मी वाद घालायला तयार आहे.''

विजयेंद्र शहरात कॉलेजमध्ये शिकत होता. तो मोठा हुषार होता. त्याचं वाचनही चांगलं होतं. सुट्टीत गावी आला की तो लहान मुलांना गमतीदार गोष्टी सांगून हसवत असे. पण हा मुलगा बुवांशी वाद कसा घालणार हे मल्हारबाबांना कळेना. तरीपण ते बुवांना म्हणाले,

''महाराज, उद्या सायंकाळी याच मंदिरात तुमची वाद-विवाद सभा होईल.''

''माझ्याशी कोण वाद घालणाराय ?''

''शेतकऱ्याचा मुलगा!''


''शेतकऱ्याचा मुलगा? बैला मागं धावणारा तो मूर्ख मुलगा माझ्याशी काय वाद घालणाराय? ठीक आहे. भर सभेत त्याला त्याची फजिती करुन घ्यायची असेल तर त्याला कोण अडवणाराय?''

दुसऱ्या दिवशी सायंकाळी वाद-विवाद ऐकण्यासाठी महादेवाच्या मंदिरात प्रचंड गर्दी झाली.

बुवा एका उच्चासनावर बसले होते. विजयेंद्र जमिनीवर बसला होता.

वाद-विवाद सुरुवात होण्यापूर्वी मल्हारबाबांनी त्या बुवांच्या गळ्यात एक मोठा पुष्पहार घातला. एक छोटा हार ते विजयेंद्राच्या गळ्यात घालायला गेले तर विजयेंद्रानं तो हार मल्हारबाबांच्या गळ्यात घातला आणि सांगितलं,

''बाबा, तुम्ही आजच्या वाद-विवाद सभेचे अध्यक्ष आहात म्हणून हा हार मी तुम्हाला घातला आहे!''



मग विजयेंद्र बुवांच्या पाया पडला आणि म्हणाला,

"महाराज, आपण पूर्णज्ञानी, वेदमहर्षी, साक्षात सूर्यनारायणासारखे तेजस्वी. मी तुम्हाला प्रमाम करतो. मी तुमच्यापुढं एक बालक आहे. या बालकाचा एक हट्ट पुरवावा."

बुवा खूष होत म्हणाले,

"बोल, मुला तुला काय हवं?"

"आजच्या वाद-विवादात पहिला प्रश्न मी तुम्हाला विचारीन. त्याला तुमची परवानगी असावी."

"एवढंच ना? ठीक आहे. विचार. कोणताही प्रश्न बेलाशक विचार!"

आता विजयेंद्र बुवांना कोणता प्रश्न विचारणार याकडं सर्वांचे डोळे लागले.

विजयेंद्र उभा राहिला. डोळे मिटून हात जोडून त्यानं देवाची प्रार्थना केली आणि म्हणाला,

"महाराज, मला संस्कृत भाषा येत नाही. मी ती भाषा शिकलो नाही. पण माझा एक संस्कृत शिकलेला मित्र आहे. त्यानं मला एक संस्कृत श्लोक शिकवला आहे पण त्याचा अर्थ मात्र त्यानं मला सांगितला नाही. तो श्लोक असा आहे.

हीना चरणा खारे कुणांतृच धीकहसिं

हे आता पिचातीप णगहा तीपतीर्वपा

बुवांनी हा श्लोक पुन: पुन्हा स्वत: शीच म्हणून पाहिला. पण त्याचा अर्थ त्यांना समजेना. त्यांचा चेहरा पडला. तरी ते स्वत:ला सावरीत उठून उभे राहिले आणि म्हणाले,

"ह्या पोरानं विचारलेला श्लोक अथर्ववेदातला आहे. पोथी पाहून या श्लोकाचा अर्थ उद्या सांगतो. कारण एकाएकी माझी प्रकृती बिघडली आहे."

सभा बरखास्त झाली. विजयेंद्रानं बुवांना मोठा पेच टाकलाय हे पाहून लोक खूष होऊन घरोघरी गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मल्हारबाबा नेहमीप्रमाणे महादेव मंदिरात गेले. पण मंदिरात बुवांचा पत्ता नव्हता. सगळीकडं बुवांचा शोध घेतला गेला. पण बुवा कुठंच आढळले नाहीत. बुवा गाव सोडून पळून गेले होते.

बुवा पळाल्याची बातमी गावभर पसरली. लोकांनी विजयेंद्राचा जयजयकार करीत त्याची गावातून मिरवणूक काढली. मिरवणूक महादेव मंदिरापर्यंत आली आणि तिथं विजयसभा झाली.

मल्हारबाबांनी विजयेंद्राला तो कालचा श्लोक पुन्हा म्हणायला आणि त्याचा जमेल तेवढा अर्थ सांगायला सुचवलं.

विजयेंद्र हसत उभा राहिला. त्यानं लोकांना विनंती केली,

"नागरिक बंधु भगिनींनो, मी तो श्लोक म्हणून दाखवतो. तो जरा काळजीपूर्वक ऐका—

हीना चरणा खारे कुणांतृच धीकहसिं हे आता पिचातीप णगहा तीपतीर्वपा

गावकरी बंधूनो हा श्लोक तुम्ही ऐकलात ना ? हा श्लोक कुठल्याही ग्रंथात, वेद उपनिषदात आढळणार नाही. हा श्लोक संस्कृतात नाही. मराठीतली दोन सरळ साधी वाक्यं आहेत. या श्लोकातली अक्षरं उलटी वाचा म्हणजे तुमच्या लक्षात येईल की ही दोन साधी वाक्यं आहेत. ती वाक्यं अशी-

'सिंह कधीच तृणांकुरे खाणारच नाही' आणि 'पार्वतीपती हा गणपतीचा पिता आहे'

विजयेंद्रानं त्या श्लोकाचा जो वरील अर्थ उलगडून दाखविला तो ऐकून लोक खो खो हसले.

विजयेंद्राच्या चातुर्यानं गावची अब्रू वाचली म्हणून लोकांनी पुनः पुन्हा विजयेंद्राचा जयजयकार केला.

● ● ●

# गोष्ट राजा चक्रमसिंगाची

अजिंक्यनगरचे राजे विक्रमसिंग यांचं अपघाती निधन झालं आणि त्यांचे पुत्र चक्रमसिंग राज्यावर आले.

चक्रमसिंग लहानपणापासूनच वेड्यासारखं वागायचे म्हणून लोक त्याना चक्रमसिंग म्हणू लागले. त्यांचं खरं नाव होतं चतुरसिंग.

चक्रमसिंग राजे झाले आणि पहिल्याच दिवशी त्यांनी थोरल्या महाराजांनी नेमलेले सर्व अधिकारी काढून टाकले. त्यातच भूपालसिंग या वृद्ध प्रधानजींचाही समावेश होता.

चक्रमसिंगांना आता नवे प्रधानजी हवे होते. पण चक्रमसिंगांच्या लहरी आणि चक्रम स्वभावाची सर्वांना माहिती असल्यामुळं कोणी चांगली व्यक्ती प्रधानपद स्वीकारायला पुढं येईना.

शेवटी कृष्णकांत नावाचा धूर्त आणि लबाड माणूस प्रधानपदासाठी निवडला गेला आणि एके दिवशी त्यानं प्रधानपदाची सूत्रं हाती घेतली.

आता कृष्णकांत हा तरुण प्रधानच प्रत्यक्षात राज्य करू लागला. कारण राजा चक्रमसिंग हे हट्टी, जुलुमी, आणि व्यसनी होते. राज्यकारभार कसा करावा याची त्यांनी कधी माहितीच करून घेतली नाही. त्यामुळं सतत दारू पिऊन आपल्या महालात ते पडलेले असत. त्यांना हवं ते पुरविण्याची चोख व्यवस्था कृष्णकांत प्रधाननं केली होती.

एके दिवशी चक्रमसिंगांनी कृष्णकांताला विचारलं,

"प्रधानजी, आमचे थोरले महाराज म्हातारे झाले म्हणून वारले हे खरं ना?"

"होय महाराज!"

"मग आम्ही पण म्हातारे झालो की मरणार हे खरं ना?"

"होय महाराज!"

"मग तुम्हाला आम्ही कशाला नेमलंय? आम्ही कधीच म्हातारे होणार नाही, कधीच मरणार नाही अशी व्यवस्था तुम्ही करायला हवी. आणि जर हे तुम्हाला शक्य नसेल तर आम्ही तुम्हाला काढून टाकू आणि तुमच्या जागी नवा माणूस नेमू!"

"तसं करू नका महाराज! पण मी एक गोष्ट तुम्हाला विचारतो महाराज. विचारू? तुमची परवानगी आहे?"



''खुशाल विचारा प्रधानजी! काय हवं ते विचारा!''

''महाराज, आपण तर तरुण आहात मग आपण म्हातारे होणार आणि एके दिवशी मरणार असं आपल्याला का वाटतं?''

''प्रधानजी, आम्ही गाढव आहोत असं का तुम्हाला वाटतं? काल आम्ही आरशात पाहिलं. तेव्हा आमच्या डोक्यावरचे केस पिकले आहेत असं दिसलं. याचा अर्थ काय?''

''महाराज, काही काळजी करू नका. त्याचा बंदोबस्त आजच करतो...!''

''मग तात्काळ करा!''

कृष्णकांत प्रधान धावत पळत राजवैद्यापाशी गेला, आणि म्हणाला, ''महाराजांचे केस पांढरे झालेत ते काळे होतील अशी व्यवस्था तात्काळ करा नाही तर तुमची आणि माझी दोघांचीही नोकरी एकदम जाईल.''

राजवैद्य म्हणूनही एक नवाच माणूस काम करीत होता. तो सुद्धा लबाडच होता. तो प्रधानाला म्हणाला, ''प्रधानजी, महाराजांचे केस पिकून पांढरे झालेत एवढीच महाराजांची तक्रार आहे ना...? मग चला तर. आत्ताच्या आता त्यांचे केस काळे करून टाकू!''

प्रधान आणि राजवैद्य चक्रमसिंग महाराजांच्या महालात गेले. आणि पाहतात तो काय महाराजांना गाढ झोप लागलेली. वैद्यराजांनी महाराजांच्या डोक्याच्या केसांना कलप लावला ; केस काळे केले!

दुसऱ्या दिवशी महाराजांनी आरशात पाहिलं. आपले केस छान काळे झाले आहेत हे बघून त्यांना आनंद झाला. त्या आनंदाच्या प्रित्यर्थ त्यांनी प्रधानाला आपल्या गळ्यातला मोत्यांचा कंठा बक्षीस म्हणून दिला.

काही दिवस जरा शांततेत गेले. एके दिवशी महाराजांनी प्रधानाला बोलवून घेऊन विचारलं,

''प्रधानजी, तुमचं आमच्याकडं लक्ष नाही. आम्ही म्हातारे व्हायला लागलो आहोत!''

''असं का म्हणता महाराज?''

''आमच्या डोळ्यांना कमी दिसायला लागलंय. तुमचा चेहरा मला स्पष्ट दिसत नाही. तुमचा चेहरा मला आज माकडासारखा दिसतो..!''

''महाराज, आज शनिवार असल्यामुळं तुम्हाला मारुतरायाचं दर्शन घडलं. तुम्ही फार पुण्यवान आहात!''

''प्रधानजी तुम्ही कसला फालतू विनोद करता? आमच्या डोळ्यांना दिसत नाही त्यावर उपाय करा... मूर्खासारखं विनोद कसले करता?''

''चूक झाली महाराज... आता पळत जाऊन राजवैद्यांना भेटून यावर उपाय शोधून काढतो.

थोड्या वेळेनंतर प्रधान महाराजांपाशी गेला, म्हणाला,

''महाराज, राजवैद्य म्हणाले की महाराज कधीच म्हातारे होणार नाहीत आणि मरणारही नाहीत...''

"अस्सं? मग आम्हाला नीट दिसत नाही ते?"

"राजवैद्यांचं यावर असं मत आहे की तुमचे डोळे म्हातारे झालेत... तुम्ही नव्हे..."

"मग यावर उपाय?"

"आहे की... जुन्या डोळ्यांनी जगाकडं पाहण्यापेक्षा नव्या डोळ्यांनी पाहावं..."

"कुठं आहेत नवीन डोळे?"

"हे पहा तुमचे नवे डोळे. याला चष्मा म्हणतात... या नवीन डोळ्यांनी तुम्हाला पूर्वी सारखं स्पष्ट दिसेल."

काही दिवस फार शांततेत गेले. मग पुन्हा महाराजांचं बोलावणं आलं. प्रधानजी धावत पळतच महाराजांकडं गेले.

"महाराज, हा बंदा हजर आहे. हुकूम व्हावा!"

"प्रधानजी, आम्ही पुन्हा म्हातारे झालो!"

"आता काय झालं महाराज?"

"आमचे सर्व दात हालतात. काल एक दात पडला.

"काही चिंता करू नका महाराज... अजून आपले वैद्यराज हयात आहेत. त्यांना विचारून यावर उपाय करू!"

प्रधान राजवैद्याकडं गेला. दोघांनी मिळून एक युक्ती योजिली. ते दोघंही महाराजांकडं गेले आणि म्हणाले,

"महाराज, मागं आपले डोळे म्हातारे झाले तेव्हा नवीन डोळे आम्ही दिले. तसं आपले सध्याचे दात म्हातारे झालेत ते काढून त्या जागी नवीन दात बसवू!"

महाराज या गोष्टीला तयार झाले. राजवैद्यांनी महाराजांचे सर्व दात काढून टाकले आणि कवळी बसवली.

थोडे दिवस शांततेत गेले. राजवैद्य मध्यंतरी नोकरी सोडून गेले. एके दिवशी महाराजांनी प्रधानजीला बोलावलं आणि विचारलं,

"प्रधानजी, आम्ही पुन्हा म्हातारे झालो!"

"आता काय झालं महाराज?"

"आमच्या छातीत विलक्षण कळा येतात. डोळ्यासमोर काजवे चमकतात. हातपाय लटपटतात. काही खावं असं वाटत नाही. वाटतं आमचा श्वासोच्छ्वास आता बंद होणार आणि आम्ही मरणार!"

प्रधानानं महाराजांची अवस्था गंभीर झाल्याचं ओळखलं. राजवैद्याला जाऊन यावर उपाय विचारता आला असता. पण ते नोकरी सोडून गेले होते. त्यामुळं प्रधानाला काय बोलावं हे सुचेना... तेव्हा महाराजच पुन्हा मोठ्यानं ओरडले,

"प्रधानजी, तुम्ही बोलत का नाही?"

"महाराज, देवांचे जे डॉक्टर अश्विनी कुमार आहेत त्यांच्याशी मघा बोललो."

"कशाविषयी बोललात?"

"तुमच्या प्रकृती विषयी!"

"काय म्हणाले ते...?"

"ते म्हणाले, महाराजांना आम्ही निश्चित बरं करू. तुमचे महाराज म्हातारे झाले नाहीत आणि ते कधीही मरणार नाहीत!"

"अस्सं? वाऽ फार छान! ते आम्हाला बघायला केव्हा येणार?"

"नाही महाराज... ते आपल्याकडं येणार नाहीत. त्यांना भेटायला तुम्हाला एकट्याला वर जावं लागेल..."

"अस्सं म्हणता? आम्ही जाऊ! पण आम्ही स्वर्गापर्यंत कसं जाणार? एक खूप उंच शिडी तयार करा!"

प्रधानानं एक खूप उंच शिडी तयार करवून घेतली. आणि त्या शिडीवर लटपटत्या पायांनी महाराज चढू लागले आणि इतक्यात खाली कोसळले. आणि बेशुद्ध झाले. पण थोड्या वेळानं शुद्धीवर आले. ते प्रधानजींना म्हणाले,

"प्रधानजी, ती शिडी फार उंच होती. ती कॅन्सल करा. नवीन, माझ्या उंचीची शिडी तयार करा. त्या शिडीवर चढायला गेलो तर मी मघा सारखा खाली पडेन. म्हणून आता असं करा. त्या लहान शिडीवर आम्हाला झोपवा. आम्ही खाली पडू नये म्हणून त्या शिडीला आम्हाला करकचून बांधा..."

"महाराज मग बराच वेळ बोलेनात तेव्हा प्रधान महाराजांजवळ जाऊन बघतो तो काय... महाराज केव्हाच स्वर्गात पोहचले होते!!

● ● ●


रावणाचा पराभव
का झाला ?

# रावणाचा पराभव का झाला ?

चौथी 'ब' च्या वर्गातली सर्वच मुलं हुषार होती. पण त्यातल्या त्यात, गोविंद फारच हुषार होता. गुरुजींनी कितीही अवघड प्रश्न विचारला तरी त्याचं अचूक उत्तर गोविंद देत असे. गोविंदानं बरीच गोष्टीची पुस्तकं वाचली होती. त्याला बऱ्याच कविता पाठ होत्या. त्याच्या आजोबांनी त्याला रामायणातल्या आणि महाभारतातल्या छान छान गोष्टी सांगितल्या होत्या. त्याच्या आईनं त्याच्याकडून मनाचे श्लोक पाठ करून घेतले होते. त्यामुळं त्याला कोणताच प्रश्न अवघड वाटत नसे.

कित्येक वेळा गुरुजींच्या प्रश्नांना गमतीदार उत्तरं देऊन तो वर्गातल्या मुलांना हसवीत असे. असं गमतीदार उत्तर त्यानं दिलं की प्रथम गुरुजी चिडत. पण आपल्या त्या उत्तराचं त्यानं व्यवस्थित समर्थन केलं की मग गुरुजीही हसत. गुरुजी खूष होऊन कधी गोविंदाची पाठ थोपटीत. कधी वर्गातल्या सर्व मुलांना गोड गोळ्या देत.

त्या दिवशी गुरुजी राम-रावणाची युद्धाची कथा रंगवून सांगत होते. मध्येच त्यांनी वर्गाला एक प्रश्न विचारला,

''रावणाचा पराभव का झाला ?''

''रावणाला गर्व झाला होता म्हणून त्याचा पराभव झाला.'' एक विद्यार्थी.

''रावण दुष्ट होता म्हणून त्याचा पराभव झाला.'' दुसरा विद्यार्थी.

''रावण पापी होता म्हणून त्याचा पराभव झाला.'' तिसरा विद्यार्थी . . .

वर्गातल्या ३९ विद्यार्थ्यांनी अशी नाना प्रकारची उत्तरं दिली. गुरुजींचं या उत्तरांनी समाधान झालं नाही. शेवटी, आता एकच विद्यार्थी उरला होता. तो म्हणजे गोविंदा. त्याला गुरुजींनी विचारलं,

''बृहस्पती, आज आपण गप्प कसे ?'' पण गोविंदानं अजिबात उत्तर दिलं नाही. तेव्हा पुन्हा गुरुजी म्हणाले, ''गोविंदा तुला माझ्या प्रश्नाचं उत्तर द्यायलाच हवं!'' गोविंदा हसत उभा राहिला आणि म्हणाला.

''गुरुजी, रावणाचा पराभव झाला त्याचं मुख्य कारण म्हणजे रावण बहिरा होता!'' गोविंदाचं अजब उत्तर ऐकून सर्व मुलं खोऽऽ खोऽऽ हसली. पण गुरुजी मात्र हसले नाहीत. क्षणभर ते गप्प राहिले. गोविदानं दिलेल्या उत्तरावर त्यांनी खूप विचार केला. पण त्याच्या उत्तराचा अर्थ त्यांना कळेना. शेवटी त्यांनी गोविंदालाच विचारलं,

''गोविंदा, रावण बहिरा होता म्हणून त्याचा पराभव झाला असं तू का म्हणतोस? त्याला काही आधार आहे काय?''

''आधार आहे तर! रावण जेव्हा श्रीशंकरांकडं आत्मलिंग मागायला गेला तेव्हा श्रीशंकर मोठ्यानं रामनामाचा जप करीत होते. याचा अर्थ ज्या शंकरांची भक्ती करून रावण रामावर विजय मिळवणार होता ते श्री शंकरच रामाच्या बाजूचे होते हे रावणानं ओळखायला नको होतं का? रावण फार मोठा शिवभक्त होता हे खरं...पण तो बहिरा असल्यामुळं श्रीशंकरांच्या मुखातून प्रकटणारं रामनाम त्याला ऐकू गेलं नाही...''

''हे सारं ठीक आहे... पण श्रीशंकर रामनाम घेतात याला काही पुरावा आहे काय?''

''रावण श्रेष्ठ शिवभक्त आणि पराक्रमी असूनही रामाकडून त्याचा पराभव झाला... हा पुरावा या संदर्भात पुरेसा नाही काय?''

गोविंदाची वाद घालण्याची चतुराई बघून गुरुजी थक्क झाले. रावणाचा पराभव तो बहिरा होता म्हणून झाला हा गोविंदाचा सिद्धांत खोडून काढणं वाल्मिकीनाच काय पण खुद्द रावणालाही शक्य होणार नाही याची खात्री गुरुजींनाही पटली!

● ● ●

# रामा शिवा गोविंदा ?

दोघं मित्र होते. एकाचं नाव रामा आणि दुसऱ्याचं नाव शिवा. दोघांनाही काम धंदा नव्हता. पोट भरण्यासाठी काय करावं हे त्यांना कळत नव्हतं. पण त्यांच्या अंगात एक विशेष गुण होता. दुसऱ्यांवर छाप पडेल असं ते बोलायचे.

एके दिवशी त्या दोघांनी ठरवलं की आपण ज्योतिष्याचा व्यवसाय करायचा.

त्यांनी भविष्य सांगणाऱ्या ज्योतिष्यांसारखा पोषाख केला. पंचागांच्या दोन प्रती विकत घेतल्या. ज्योतिषावरची एक दोन पुस्तकं घेतली. आणि स्वत: जवळ ज्योतिष विद्या नसतानाही ज्योतिष कसं सांगायचं याची एक युक्तीही त्यांनी शोधून काढली.

आदल्या दिवशी साध्या पोषाखात एखाद्या गावात जाऊन तिथल्या प्रमुख घरांची आणि माणसांची बारीक सारीक माहिती मिळवून त्याच माहितीच्या आधारानं दुसऱ्या दिवशी ते ज्योतिष सांगायचे.

रामा आणि शिवा अजबपूर नावाच्या एका खेड्यात गेले. त्या दिवशी त्यांचा पोषाख साधा होता. गावातल्या श्रीमंत सावकारांची बरीच माहिती त्यांनी गोळा केली. दुसऱ्या दिवशी ते धनमल शेठजींच्या घरी गेले. दारातूनच त्यांनी शेठजींना हाक मारली.

"शेठजी, आम्ही वाराणशीचे, भविष्य सांगणारे निष्णात ज्योतिषी. पत्रिका, हात न बघता केवळ चेहरा पाहून भूत-भविष्य कथन करू!"

शेठजींनी त्या दोघांकडं पाहिलं आणि ते एकदम प्रभावित झाले. कारण ते दोघे ज्योतिषी अस्खलित वाणीत बोलत होते. त्यांच्या कपाळावरील भस्म आणि त्यावर रेखलेल्या कुंकुम तिलकानं ते दोघंही तेजस्वी तपस्वी वाटत होते.

शेठजींनी त्यांचं चांगल्याप्रकारे आगत स्वागत केलं. धनमल शेठजींची आदल्या दिवशी जी माहिती मिळाली होती त्या आधारे रामानं शेठजींचा सारा भूतकाळ चटकदार भाषेत सांगितला. शेठजींचा लोभीपणा लक्षात घेऊन ते नजीकच्या काळात कोट्याधिश होणार असं भविष्य कथन शिवानं केलं.

शेठजी भविष्य ऐकून खूष झाले. त्यांनी प्रत्येकी पाच 'खरे' रुपये दक्षिणा दिली.

धनमल शेठजीसारख्या चिक्कू माणसानं या ज्योतिषांना खरे रुपये दक्षिणा दिली ही वार्ता गावभर झाली तेव्हा साऱ्या लोकांना आश्चर्य वाटलं. हे ज्योतिषी फारच ज्ञानी आहेत याची खात्रीही लोकांना पटली.



मग या ज्योतिषांच्या भोवती लोकांचा गराडाच पडला. एकेकाचं भविष्य सांगून रामा-शिवा या ज्योतिष्यांनी भरपूर कमाई केली.

दुसऱ्या दिवशी पहाटे ते दुसऱ्या गावी जायला निघाले. त्यांना पोचवायला, गावच्या वेशीपर्यंत, धनमल शेठजी आणि इतर गावकरी आले होते. एका गावकऱ्यानं या ज्योतिष्यांना विचारलं,

''महाराज, ज्योतिष्याच्या आधारानं तुम्ही एखादा माणूस पूर्व जन्मात कोण होता हे सांगाल काय ?''

कुणाचा पूर्व जन्म सांगू ? शिवानं उलट प्रश्न केला. आणि पुढं लगेच तो म्हणाला,

''या धनमल शेठजींचा पूर्व जन्म सांगू ?''

''सांगा !'' सर्व नागरिक मोठ्या उत्साहात ओरडले.

शिवा उत्तरला.

''मग ऐका तर ! हे धनमल शेठजी गेल्या जन्मात नाग साप होते. यांचे वडील खूप श्रीमंत होते. त्यांनी सोन्याच्या मोहरांनी भरलेला हंडा आपल्या शेतात पुरून ठेवला होता. त्या हंड्याचं रक्षण करीत एक नाग साप कायमचाच त्या हंड्यावर बसलेला असे. शेठजीच्या वडिलांनी ग्रा नागाला मारून तो हंडा एके दिवशी तिथून काढला. तो मेलेला नाग या धनमल शेठजींच्या वडिलांच्या पोटी जन्माला आला. आणि हे धनमल शेठजी महा खुनशी आहेत. गेल्या जन्मात आपल्या बापानं मारलं म्हणून या जन्मात आपल्या बापावर सूड उगवला. रात्रीच्या वेळी धनमल शेठजींनी आपल्या बापाला माडीवरून ढकलून देऊन त्यांचा जीव घेतला.''

धनमल शेठजींनी आपल्या बापाला अशा रीतीनं ठार मारलं ही हकीकत त्यांना माहीत झाली होती म्हणूनच त्यांनी अशी कथा भविष्य म्हणून सांगितली.

पण आपलं हे बिंग चारचौघांसमोर बाहेर फुटलं हे पाहून धनमल शेठजींनी आपल्या घराकडं धूम ठोकली.

लोक खो-खो हसले.

एकानं पुन्हा ज्योतिष्यांना विचारलं,

''महाराज हा चौधरी गेल्या जन्मी कोण होता ?''

''डुक्कर !'' शिवा ओरडला.

''याला पुरावा ?'' चौधरी किंचाळला.

''पुरावा हवा ? हा घे. गेल्या जन्मी तू डुक्कर होतास. तुझी वासना अतिशय वाईट होती. ती कधीच कमी झाली नाही. लोकांना लुबाडण्यात तुला फार आनंद वाटे. आजदेखील जकात नाक्यावर बसून तू लोकांकडून पैसे उकळतोस !''

चौधरीनं पण खाली मान घालून धूम ठोकली.

इतकं अचूक भविष्य सांगणाऱ्या या ज्योतिष्यांनी आपलं बिंग बाहेर फोडू नये म्हणून त्यांना भरपूर

दक्षिणा देऊन इतर लोकही निघून गेले. !

हा सारा गमतीचा खेळ पाहात एक माणूस दूर उभा होता. त्याचं नाव गोविंदा. गोविंदानं त्या ज्योतिष्यांना विचारलं,

"महाराज आपण भविष्य म्हणून जे सांगितलं त्यासाठी लागणारी आवश्यक ती माहिती आपण काल लोकांकडून गोळा केली. आणि त्या माहितीला जुळेल अशी पूर्व जन्माची कथा तयार केली. तुम्ही ज्योतिषी वैगेरे कुणीही नाही. पण तुम्ही फार चतुर आहात."

"हे तू अचूक ओळखलंस कसं?"

"काल तुम्ही बाजारात हिंडत असताना तुमच्या मागावरच मी होतो!"

"याचा अर्थ तू आमच्यापेक्षा चतुर आहेस! आता आपण असं करू या तिघं मिळून एक ज्योतिष फर्म उघडू या." रामा म्हणाला.

"आणि फर्मचं नाव काय ठेवायचं?" शिवाचा प्रश्न.

"रामा-शिवा-गोविंदा!" गोविंदा ओरडला!

● ● ●